Print Title: Arthniti, Mumbai Edition

Date: 12 Oct 2010

"Hong Kong Trade Council's Lifestyle Expo"

## हाँगकाँग ट्रेड कौन्सिलचा लाइफस्टाईल एक्सपो

हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सिलचा (एचकेटीडीसी),डिपार्टमेंट ऑफ फॉरेन ट्रेड अँड इकॉनॉमिक को-ऑपरेशन ऑन गुआँगडॉंग प्रोव्हीन्स (जीडी-डीओएफटीईसी) यांच्या सहकार्यातून लाइफस्टाईल एक्सपो इन मुंबई (एलईएम)चे आयोजन २८ ते ३० ऑक्टोबर या दरम्यान केले आहे.

एलईएम २०१० मध्ये भारतीय कंपन्यांना हाँगकाँग आणि गुआँगडॉंग प्रोव्हीन्स (चीन) मधील दर्जेदार जीवनशैली उत्पादनांची विस्तृत श्रेणी उपलब्ध होणार आहे. एका अनोख्या अशा ट्रेड शोचे आयोजन भारतात पहिल्यांदाच करण्यात येत असून एलईएम २०१० चा सर्व भर उच्च दर्जाची उत्पादने आणि ब्रॅण्ड्सवर असणार आहे. त्या माध्यमातून भारतीय रिटेलर्स आणि हाँगकाँग व गुआँगडॉंग येथील उत्पादक यांच्यादरम्यान नवीन व्यवसाय भागीदारी स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे.

यावेळी बोलताना एचकेटीडीच्या साऊथईस्ट एशिया व इंडियाच्या प्रादेशिक संचालक लॉरेट्टा वॅन यांनी सांगितले की, मुंबईतील शुभारंभाच्या लाइफस्टाईल एक्सपोची घोषणा करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

हाँगकाँग हे आशियातील एक प्रख्यात डिझाईन केंद्र आहे आणि गुआँगडॉंग हे आपल्या उत्पादक कौशल्यासाठी सर्वश्रुत आहे. दोन्हीचा मिळून भारतीय ग्राहकांसाठी एक अतुलनीय अनुभव प्राप्त होणार आहे, असेही ते म्हणाले.